सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २०६ • गुरुवार दि.१४ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेडकरांना जोरदार पावसाने झोडपले

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या काही दिवसांपासून वाढत्या उन्हामुळे हैराण असलेल्या नांदेडकरांना गुरुवारी पहाटेच्या सुमारास पडलेल्या जोरदार पावसाने अक्षरशः झोडपले. त्यामुळे काही काळ वाढत्या तापमानापासून सुटका मिळाली.

मागील आठ दिवसांपासून नांदेडसह राज्यभरातील तापमानाने उच्चांक गाठला होता. हवामान विभागाने तीन दिवसांचा यलो अलर्टही जारी केला आहे. दरम्यान गुरुवारी पहाटे ३ च्या सुमारास नांदेड शहर व परिसरात जोरदार पाऊस बरसला. पहाटे सुरु झालेल्या पावसामुळे सकाळच्या लग्न समारंभांमध्ये एकच धांदल उडाली. दुपारी १२ वाजेपर्यंत ढगाळ वातावरणात मोठ्या प्रमाणात उकाडा निर्माण झाला. पहाटे झालेल्या पावसामुळे शहरातील सखल भागात रस्त्यावर चांगलेच पाणी साचले होते. दुपारनंतर मात्र पुन्हा तीव्र ऊनाच्या झळा अनुभवयास मिळाल्या.

## नीट पेपरफुटी प्रकरणी सहा जणांना अटक

### नाशिक पाठोपाठ लातूर कनेक्शन तपासाला वेग

नवी दिल्ली:देशभर गाजत असलेल्या नीट (यूजी)-२०२६ पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) तपासातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. टेलिग्राम ॲप, कुरिअर सेवा आणि लाखोंच्या व्यवहारांच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका विक्रीचे मोठे रॅकेट चालत असल्याचे उघड झाले असून, देशभरातून आतापर्यंत सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह राजस्थान आणि हरियाणा येथील आरोपींचा या प्रकरणात सहभाग असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, लातूर कनेक्शनच्या तपासालाही आता वेग आला आहे.




सीबीआयने जयपूरमधून मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल, गुरुग्राममधून यश यादव, तर महाराष्ट्रातील नाशिकमधून शुभम खैरनार आणि अहिल्यानगरमधून धनंजय लोखंडे यांना अटक केली आहे. आरोपींकडून मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. अनेक संशयितांची चौकशी सुरू असून तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, नाशिकचा शुभम खैरनार हा करिअर काऊन्सिलिंगच्या नावाखाली वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे जाळे तयार करत होता. बीएएमएसच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणारा शुभम स्वतःला करिअर काऊन्सिलर म्हणून काम करत असल्याचे सांगत होता. पुण्यातून कुरिअरद्वारे त्याच्याकडे प्रश्नपत्रिका पोहोचवण्यात आली होती. त्यानंतर त्याने टेलिग्रामच्या माध्यमातून हरियाणातील मध्यस्थांना ती विकल्याचे तपासात उघड झाले आहे.अहिल्यानगरचा धनंजय लोखंडे याने पुण्यातून कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिका शुभम खैरनारकडे पाठवली होती. शुभमने ही प्रश्नपत्रिका १० लाख रुपयांत खरेदी करून पुढे गुरुग्राम येथील मध्यस्थांना १५ लाख रुपयांत विकल्याची पान ४ वर

## मोठ्या शासकीय कार्यक्रमांवर सहा महिणे निर्बंध

# मुख्यमंत्री फडणवीसांची बुलेटवारी

मुंबई/प्रतिनिधी-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे चक्क रॉयल एनफिल्ड ३५०(बुलेट) दुचाकीवरून विधानभवनात दाखल झाले. त्यांच्या सोबत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार तसेच सुरक्षा ताफ्यातील अधिकारीही दुचाकींवरून आले होते. इंधन बचत, साधेपणा आणि खर्च नियंत्रणाचा संदेश देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उचललेल्या या पावलाची राज्यभर चर्चा रंगली आहे.



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या वतीने मोठी घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी काही निर्देश दिले आहेत. त्यानुसार इंधन बचत आणि परकीय चलन बचतीसाठी शक्य ते सर्व प्रयत्न आम्ही करणार आहोत. लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेतल्यास त्याचा प्रभाव जनतेवर पडतो. त्यामुळे आज मी मोटारसायकलने विधानभवनात आलो असून, साताऱ्यातील एक शासकीय कार्यक्रम आधीच नियोजित असून त्यावर खर्चही झालेला असल्याने तो रद्द करण्यात येणार नाही. मात्र, यानंतर पुढील सहा महिने शासनाच्या वतीने कोणतेही मोठे शासकीय कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत, अशी महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी पान ४ वर

## आ.राजेश पवार यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात फळं वाटप

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश पवार यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय नायगाव बाजार येथे रुग्णांना फळ वाटपाचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली.

या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पपुलवाड मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आ. राजेश पवार



मित्र मंडळाचे देविदास अण्णा बोंबनाळे, राजेश पाटील हंबर्डे, प्रतिभाताई धानोरकर, पल्लवीताई वडजे, माधव पाटील चितले, बळीराम पाटील वडजे, अवकाश पाटील धुपेकर, राजू पाटील बेळगे, माधव पाटील बेंद्रीकर, केशव पाटील हंबर्डे, गोविंद पाटील हंबर्डे, चक्रधर पाटील हंबर्डे, मनीष पाटील हंबर्डे, मारुती पाटील राहेरकर, ऋषिकेश पाटील कदम, पप्पू पाटील कदम, रवी राठोड आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी जपत रुग्णसेवेचा संदेश देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत १४ निर्णय

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील जलसंपदा, मृद व जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, नगर विकास आणि मराठी भाषा विभागासह अनेक विभागांच्या योजनांना आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. विशेषतः धरणांतील गाळ काढण्याचे नवे धोरण, पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, नाशिक रिंग रोड आणि सिंधुरत्न समृद्ध योजना या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत कोकण, नाशिक, पुणे आणि राज्यातील विविध विभागांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राज्य सरकारने पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरण जाहीर केले. प्रारंभी सहा मोठ्या प्रकल्पांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही योजना राबवली जाणार आहे. यामुळे धरणांची पाणीसाठा क्षमता वाढणार असून शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. धरणांचे संवर्धन आणि देखभालही अधिक प्रभावीपणे होणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. तसेच नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) पान ३ वर







## कठोर कारवाईची गरज

राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा अर्थात एनटीएच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ''नीट'' सारख्या स्पर्धा परीक्षा या केवळ शैक्षणिक प्रक्रिया नसून लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा असतात. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न डोळ्यांत साठवून देशभरातील विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत घेत असतात. अशा परिस्थितीत २०२६ साठी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेवर पुन्हा एकदा पेपरफुटीचे गंभीर आरोप झाले आणि परीक्षा रद्द करण्याची वेळ आली, ही केवळ प्रशासकीय चूक नाही तर शिक्षण व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे. यंदा तब्बल दोन कोटीहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी काही मोजक्या व्यक्तींनी पैशाच्या आणि सत्तेच्या जोरावर हजारो विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचवली असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अशा प्रकारचे प्रकार म्हणजे गुणवत्तेची, प्रामाणिकतेची आणि समान संधीच्या तत्त्वांची सरळसरळ हत्या होय. विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि पालकांच्या त्यागावर पाणी फेरणाऱ्या या गुन्ह्याकडे केवळ ''तपास सुरू आहे'' या नेहमीच्या सरकारी वाक्याने पाहता येणार नाही. विशेष चिंतेची बाब म्हणजे २०२४ मध्येही अशाच प्रकारे नीट पेपरफुटीचे प्रकरण समोर आले होते. त्या वेळी दिल्लीपासून अनेक राज्यांपर्यंत धाडी, अटकसत्र आणि चौकशा झाल्या. मोठमोठे दावे करण्यात आले. मात्र दोन वर्षांनंतरही अनेक आरोपी जामिनावर बाहेर फिरत असल्याचे चित्र आहे. त्यांच्या खटल्यांचे पुढे काय झाले, दोषींना शिक्षा का झाली नाही, तपास यंत्रणांनी कोणती ठोस कारवाई केली, याचे उत्तर जनतेला मिळालेले नाही. परिणामी गुन्हेगारांचे मनोबल वाढले आणि पुन्हा त्याच प्रकारची पुनरावृत्ती झाली, असे म्हणावे लागेल.कायद्याचा धाक संपला की भ्रष्टाचार माजतो. परीक्षा व्यवस्थेभोवती निर्माण झालेली ही गुन्हेगारी साखळी आता संघटित स्वरूप धारण करत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पेपरफुटीमध्ये तांत्रिक तज्ज्ञ, कोचिंग माफिया, मध्यस्थ, काही भ्रष्ट अधिकारी आणि राजकीय पाठबळ असलेले घटक सहभागी असल्याचे आरोप सातत्याने होत आहेत. यावर्षीच्या प्रकरणात राजस्थानमधील एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याचे नाव समोर येत असल्याच्या बातम्या अधिकच गंभीर आहेत. आरोप खरे असतील तर हा केवळ परीक्षा गैरव्यवहार राहात नाही, तर सत्तेचा दुरुपयोग आणि प्रशासनातील हस्तक्षेप यांचेही उदाहरण ठरते. कोणताही पक्ष सत्तेत असो, शिक्षण व्यवस्थेच्या पवित्रतेशी खेळ करणाऱ्यांना राजकीय संरक्षण मिळता कामा नये. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक अन्याय विद्यार्थ्यांवर झाला आहे. लाखो विद्यार्थ्यांनी प्रचंड मानसिक ताण, आर्थिक खर्च आणि अभ्यासाचा दबाव सहन करून परीक्षा दिली. परीक्षा रद्द झाल्यानंतर त्यांच्यावर पुन्हा अभ्यास, अनिश्चितता आणि मानसिक नैराश्याचे संकट कोसळले आहे. ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी तर ही परिस्थिती अधिक वेदनादायक आहे. काही जणांनी कर्ज काढून कोचिंग घेतले, घरापासून दूर राहून तयारी केली. त्यांच्या आयुष्याशी असा खेळ करणे अक्षम्य आहे. म्हणूनच या वेळी केवळ कसून तपास पुरेसा ठरणार नाही. तपासाचा शेवट दोषींवरील कठोर आणि जलद शिक्षेत झाला पाहिजे. या प्रकरणासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करून सहा महिन्यांच्या आत खटले निकाली काढण्याची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेत डिजिटल सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे एन्क्रिप्शन, वाहतुकीतील पारदर्शकता आणि स्वतंत्र देखरेख यंत्रणा यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवाव्या लागतील. तसेच एनटीएसारख्या संस्थांची जबाबदारी निश्चित करून निष्काळजी अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. देशातील तरुणाईचा विश्वास हा कोणत्याही व्यवस्थेचा सर्वात मोठा आधार असतो. जर विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे अभ्यास करूनही यश मिळेल याची खात्री राहिली नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता कोलमडेल. त्यामुळे नीट पेपरफुटी प्रकरण हे केवळ एका परीक्षेचे संकट नाही; ते देशाच्या भविष्यासमोरील गंभीर आव्हान आहे. सरकारने या वेळी केवळ तपासाच्या घोषणा न करता, दोषींना उदाहरण ठरेल अशी शिक्षा करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे हीच काळाची खरी गरज आहे.

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज



छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले.

मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला व पाठीत खंजीर खुपसला.यालाच म्हणतात घर का भेदी लंका ढाये१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किँचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज तब्बल ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण, मुलींवरील व महिलांवरील अत्याचार इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे. यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पित आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण -बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्लूयांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्लूयात महाराष्ट्राची खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**रमेश लांजेवार**
नागपूर.

# दिखाऊ जीवनशैली,नैतिक संकट आणि समाजाला आत्मपरीक्षणाची गरज

आजचा समाज झपाट्याने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, आधुनिकता, फॅशन, सोशल मीडिया, आर्थिक स्पर्धा आणि दिखाऊ जीवनशैली यामुळे माणसाच्या जीवनपद्धतीत मोठे बदल झाले आहेत. परंतु या बदलांसोबत समाजात अनेक गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत. गुन्हेगारी वाढ, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, महिलांवरील अत्याचार, तरुण पिढीतील दिशाहीनता, व्यसनाधीनता, सामाजिक असंतुलन आणि कुटुंबव्यवस्थेतील ताणतणाव या समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालल्या आहेत.

आज अनेकदा एखादी घटना घडल्यानंतर समाजात चर्चा सुरू होते, आरोप-प्रत्यारोप होतात, सोशल मीडियावर संताप व्यक्त केला जातो; पण काही दिवसांनी पुन्हा सर्व शांत होते आणि पुढे दुसरे एखादे प्रकरण समोर येते. अशा परिस्थितीत केवळ एखाद्या व्यक्तीला दोष देऊन प्रश्न सुटणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.देश आर्थिक संकटातून जात असताना लोक मात्र चैनीच्या आणि दिखाऊ जीवनशैलीच्या मागे धावताना दिसतात. गरज आणि हौस यातील फरक लोक विसरत चालले आहेत. आज प्रत्येकजण इतरांना प्रभावित करण्यासाठी महागड्या वस्तू, फॅशन, दागिने, वाहनं आणि लक्झरी जीवनशैली यांचे प्रदर्शन करताना दिसतो. यामुळे समाजात असंतोष, स्पर्धा आणि चुकीच्या मार्गाने पैसा कमविण्याची मानसिकता वाढते. मर्यादित जीवनशैली माणसाला केवळ आर्थिकदृष्ट्या सुरक्षित ठेवत नाही, तर त्याला सामाजिक आदरही मिळवून देते. आज तरुण पिढी मोठ्या प्रमाणात सोशल मीडियाच्या प्रभावाखाली आहे. इंटरनेट आणि मोबाईलमुळे जग जवळ आले असले, तरी त्याचा चुकीचा वापरही मोठ्या प्रमाणात होत आहे. लहान वयातील मुला-मुलींना सहजपणे अश्लीलता, हिंसा आणि चुकीच्या विचारांचा सामना करावा लागतो. सतत प्रसारित होणारे उत्तेजक दृश्य, वेब सिरीज, चित्रपट आणि सोशल मीडियावरील ट्रेंड यामुळे त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने वेळेत योग्य मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे झाले आहे.आज अनेक गुन्ह्यांमध्ये तरुणांचा सहभाग दिसून येतो. यामागे केवळ कायद्याची भीती कमी होणे एवढेच कारण नाही, तर नैतिक शिक्षणाचा अभाव हेही मोठे कारण आहे. पूर्वी घरात संस्कार दिले जात, मोठ्यांचा आदर, महिलांचा सन्मान, संयम आणि जबाबदारी यांचे महत्त्व शिकवले जात होते. आज मात्र पालक स्वतः व्यस्त झाले आहेत. मुलांना वेळ देण्याऐवजी मोबाईल दिला जातो. परिणामी मुलांचे भावनिक आणि नैतिक शिक्षण अपूर्ण राहते. समाजात घडणाऱ्या अनेक गुन्ह्यांवर चर्चा करताना केवळ एका बाजूला दोष देऊन उपयोग नाही. कोणतीही घटना घडण्यामागे अनेक सामाजिक, मानसिक आणि आर्थिक कारणे असतात. म्हणूनच प्रत्येक प्रकरणाचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. महिलांवरील अत्याचार, लैंगिक गुन्हे किंवा समाजातील अनैतिक प्रवृत्ती यांना फक्त सनसनाटीपणे दाखवून प्रश्न सुटणार नाही. त्यामागील कारणे समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.आज फॅशन आणि शरीरप्रदर्शन यावरही मोठ्या प्रमाणात चर्चा होते. आधुनिकता म्हणजे मर्यादा सोडणे असा गैरसमज वाढताना दिसतो. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या जीवनशैलीचा अधिकार असला तरी समाजातील वातावरण, सुरक्षितता आणि सांस्कृतिक मूल्ये यांचाही विचार केला पाहिजे. फॅशन ही सुसंस्कृत आणि मर्यादित असावी. शरीरप्रदर्शनाला प्रोत्साहन देणारी संस्कृती समाजात चुकीचे संदेश देऊ शकते. मात्र याचा अर्थ असा नाही की कोणत्याही गुन्ह्यासाठी केवळ महिलांनाच जबाबदार धरावे. गुन्हेगाराला त्याच्या कृत्याची संपूर्ण जबाबदारी घ्यावी लागेल. समाजाने महिलांचा सन्मान राखत योग्य मूल्यांची जपणूक करणे आवश्यक आहे. आज ब्युटी पार्लर, पब, हुक्का पार्लर, ड्रग्ज पार्टी आणि काही संशयास्पद व्यवसाय यांच्याबाबत समाजात प्रश्न उपस्थित केले जातात. प्रत्येक व्यवसाय चुकीचा असतो असे नाही; परंतु ज्या ठिकाणी अनैतिक किंवा बेकायदेशीर प्रकार चालतात, त्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. प्रशासनाने नियमित तपासणी करणे, परवाना व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.मोठ्या शहरांमध्ये वेश्याव्यवसाय, मानव तस्करी आणि महिलांचे शोषण ही गंभीर समस्या आहे. अनेक महिला स्वतःच्या इच्छेने नव्हे, तर गरिबी, फसवणूक, जबरदस्ती किंवा परिस्थितीमुळे त्या दलदलीत अडकतात. त्यामुळे अशा महिलांकडे केवळ तुच्छतेने पाहण्याऐवजी त्यांचे पुनर्वसन, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरण करण्याची गरज आहे. समाजाने या प्रश्नाकडे मानवी दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.आज माध्यमांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म टीआरपीसाठी सतत गुन्हे, हिंसा आणि उत्तेजक दृश्ये दाखवत असतात. एखादी घटना घडल्यानंतर ती पुन्हा पुन्हा दाखवली जाते. याचा परिणाम लहान मुलांच्या आणि तरुणांच्या मानसिकतेवर होतो. माध्यमांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर जबाबदारीने केला पाहिजे. समाजाला योग्य दिशा देणे हेही माध्यमांचे कर्तव्य आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नैतिक शिक्षण, लैंगिक शिक्षण, कायद्याची माहिती आणि आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. मुला-मुलींना योग्य-अयोग्य यातील फरक समजावून सांगितला पाहिजे. समाजात कसे वागावे, इतरांचा आदर कसा करावा, सोशल मीडियाचा वापर कसा करावा आणि स्वतःची सुरक्षितता कशी राखावी याबाबत मार्गदर्शन आवश्यक आहे.आज देशासमोर आर्थिक संकट, बेरोजगारी आणि महागाई यांसारखे प्रश्न आहेत. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे दर वाढत आहेत. अशा परिस्थितीत लोकांनी अनावश्यक खर्च टाळला पाहिजे. साधेपणाने जगण्याची सवय समाजात पुन्हा निर्माण झाली पाहिजे. महागड्या वस्तूंचे प्रदर्शन करण्यापेक्षा गरजू लोकांना मदत करण्याची भावना वाढली पाहिजे.वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. प्रत्येक घरात दोन-तीन गाड्या दिसतात. त्यामुळे इंधनाचा वापर वाढत आहे आणि प्रदूषणही वाढत आहे. शक्य तिथे सार्वजनिक वाहतूक, सायकल किंवा पायी चालण्याचा वापर वाढवला पाहिजे. यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल आणि आर्थिक बचतही होईल.

राजकीय क्षेत्रातही खर्च आणि दिखाऊपणा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. एखाद्या मंत्र्याच्या किंवा नेत्याच्या मागे अनेक गाड्यांचा ताफा फिरतो. सुरक्षा व्यवस्थेवर कोट्यवधी रुपये खर्च होतात. लोकप्रतिनिधी हे समाजाचे सेवक आहेत, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. सार्वजनिक पैशाचा वापर लोकांच्या मूलभूत गरजांसाठी झाला पाहिजे.आज ग्रामीण भागातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. महिलांना आणि शेतकऱ्यांना अनेक किलोमीटर दूर जाऊन पाणी आणावे लागते. बदलते हवामान, जंगलतोड आणि पाण्याचा चुकीचा वापर यामुळे ही समस्या अधिक वाढली आहे. जलसंधारण, वृक्षारोपण आणि पाणी बचत यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे.भेसळयुक्त अन्नपदार्थ हीसुद्धा गंभीर समस्या बनली आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. आज पैसा कमावण्यासाठी अनेकजण नैतिकता विसरत आहेत. त्यामुळे समाजात प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची भावना कमी होत आहे.समाजात जातीय आणि धार्मिक तेढ वाढविण्याचाही प्रयत्न अनेकदा केला जातो. परंतु देशाची खरी ताकद ही विविधतेतील एकता आहे. सर्व धर्म, जाती आणि समाजघटकांनी परस्पर सन्मान आणि सलोखा राखणे आवश्यक आहे. द्वेष पसरवून कोणाचाही फायदा होत नाही. शांतता, बंधुता आणि सामाजिक ऐक्य यामुळेच देश प्रगती करू शकतो. आजची परिस्थिती पाहता प्रत्येकाने स्वतःपासून बदल सुरू करणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांना वेळ द्यावा, शिक्षकांनी संस्कार द्यावेत, समाजाने जबाबदारीने वागावे, माध्यमांनी संयम पाळावा आणि प्रशासनाने कठोरपणे कायद्याची अंमलबजावणी करावी. केवळ सरकारवर किंवा एखाद्या संस्थेवर दोष टाकून प्रश्न सुटणार नाही.आपण समाजात कोणते वातावरण निर्माण करतो, यावर पुढील पिढीचे भविष्य अवलंबून आहे. जर आपण सतत द्वेष, हिंसा, अश्लीलता आणि दिखाऊपणा यांनाच महत्त्व दिले, तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतील. परंतु जर आपण संस्कार, संयम, साधेपणा, शिक्षण आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले, तर समाज अधिक सुरक्षित आणि सुसंस्कृत बनेल.आज गरज आहे ती दोषारोप करण्याची नाही, तर आत्मपरीक्षण करण्याची. प्रत्येकाने स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखल्या पाहिजेत. महिलांचा सन्मान, मुलांचे संरक्षण, तरुणांना योग्य दिशा, गरीबांना आधार आणि समाजात नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना हेच खरे राष्ट्रनिर्मितीचे काम आहे.

समाज बिघडत चालल्याची चिंता अनेकांच्या मनात आहे. ही चिंता योग्यही आहे. परंतु केवळ टीका करून उपयोग नाही. सकारात्मक बदलासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. समाजात भीती नव्हे तर विश्वास निर्माण झाला पाहिजे. माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांची जपणूक झाली तरच देश खऱ्या अर्थाने मजबूत बनेल.ही एका ज्येष्ठ नागरिकाची समाजाबद्दलची तळमळ आहे. समाज सुरक्षित, सुसंस्कृत आणि शांततामय व्हावा, हीच प्रत्येक सुजाण नागरिकाची इच्छा असली पाहिजे. चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करून योग्य दिशेने पुढे जाणे हेच समाजाच्या हिताचे आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# माहूर तालुक्यातील चारही मंडळे नुकसान भरपाई निश्चिती प्रक्रियेत

माहूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील १६ पैकी १६ तालुक्यांतील शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसानभरपाई जाहीर करण्यात आली होती. मात्र माहूर तालुक्यातील चारही महसूल मंडळांचा यात समावेश नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या निर्णयाविरोधात विविध राजकीय पक्षांसह सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवेदने देत आंदोलनाचा इशाराही दिला होता.प्रशासनाकडून प्राप्त माहितीनुसार जिल्ह्यातील सर्व ९३ महसूल मंडळे नुकसानभरपाईसाठी पात्र ठरली असून तब्बल ६ लाख ३४ हजार ६२३ शेतकरी अर्जदारांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे माहूर तालुक्यातील चारही मंडळांचा अखेर नुकसानभरपाई निश्चिती प्रक्रियेत समावेश झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत.

अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पिकांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान आणि आर्थिक संकट अशा दुहेरी-तिहेरी अडचणींना तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना पीक विमा लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याने संतापाची लाट उसळली होती. विविध राजकीय पक्ष, शेतकरी संघटना तसेच शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला होता. जिल्ह्यातील इतर तालुक्यांना नुकसानभरपाई मिळत असताना माहूर तालुक्याला का वगळण्यात आले? असा सवाल उपस्थित करत अनेक ठिकाणी निवेदने देण्यात आली. या पार्श्वभूमीवर प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला होता.या प्रकरणाची गंभीर दखल घेत आमदार भीमराव केराम यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देत आता आणखी टाळाटाळ चालणार नाही, असा सज्जड दम भरला होता.यापूर्वी प्रशासनाकडून १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात थेट विमा रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे आश्वासन देण्यात आले होते. आता उशिरा का होईना, पण खरीप पेरणीपूर्वी शेतकऱ्यांच्या हक्काची नुकसानभरपाई व विमा रक्कम खात्यात जमा झाल्यास मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# ग्रामीण गृहनिर्माणात नांदेड जिल्हा परिषदेचा राज्यात डंका

## राज्यातून पटकावला प्रथम क्रमांक;उद्या साताऱ्यात होणार पुरस्काराने सन्मान

नांदेड/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील बेघर व गरजू नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध स्तरावर प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत नांदेड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, तालुका स्तरावर माहूर तालुक्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मान मिळविला आहे.

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्य पुरस्कृत आवास योजनेत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच मोदी आवास योजना या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत नांदेड जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य करत राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. त्याचबरोबर आदिवासी बहुल माहूर तालुक्यानेही उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर राज्यात सर्वोत्कृष्ट तालुक्याचा बहुमान मिळविला आहे. या यशामागे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी सातत्याने पाठपुरावा करून अभियान गतिमान केले. त्यामुळेच नांदेड जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.माहूर तालुक्यातही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. लाभार्थ्यांना वेळेत घरे मंजूर करणे, बांधकाम पूर्णत्वास नेणे आणि शासनाच्या उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता करणे यामध्ये माहूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली.

या पुरस्कारांचे वितरण १५ मे रोजी सैनिक स्कूल, सातारा येथे होणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले तसेच माहूरचे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# जनावरांच्या आरोग्यासाठी पिंपळगाव पशुवैद्यकीय दवाखान्याचा पुढाकार

## लिमगुडा व कोलामपोड येथे औषध वाटप शिबिर;३५ पशुपालकांना लाभ

मांडवी/प्रतिनिधी-पशुधनाचे आरोग्य सुदृढ राहावे तसेच दुग्ध उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने पशुवैद्यकीय दवाखाना, पिंपळगाव यांच्या वतीने मौजे लिमगुडा व कोलामपोड येथे विशेष औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. दि.१३ मे रोजी पार पडलेल्या या उपक्रमात ३५ गरजू पशुपालकांना विविध अत्यावश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून जनावरांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या मिनरल मिक्सचर, जंतनाशक औषधे तसेच गोचीड व गोमाश्या प्रतिबंधक फवारणी औषधांचे वितरण करण्यात आले. मिनरल मिक्सचरमुळे जनावरांची प्रतिकारशक्ती वाढून दुग्ध उत्पादनात मदत होते, तर जंतनाशक औषधांमुळे जनावरांचे पोषण सुधारण्यास हातभार लागतो. बाह्य परजीवींमुळे होणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक औषधांचेही वाटप करण्यात आले.यावेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पशुपालकांना पावसाळ्यापूर्व काळात जनावरांची घ्यावयाची काळजी, गोठ्याची स्वच्छता, संतुलित आहाराचे महत्त्व आणि गोचीड तापासारख्या आजारांपासून बचावासाठी नियमित फवारणी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.शासकीय योजनांचा लाभ थेट पशुपालकांच्या दारापर्यंत पोहोचत असल्याने लिमगुडा व कोलामपोड येथील पशुपालकांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमामुळे पशुधनाची गुणवत्ता सुधारण्यास आणि पशुपालन व्यवसायाला बळकटी मिळण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास स्थानिक ग्रामस्थ, पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित



होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, जिल्हा तांत्रिक मार्गदर्शक सहायक आयुक्त डॉ. अरविंद गायकवाड, पंचायत समिती किनवट तालुका पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. संजीव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना पिंपळगावचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. डी. आर. बचंटी व पट्टिबंधक प्रकाश करदरवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ.भगवान जाधव व डॉ.अर्चना जाधव यांच्या पुढाकारातून निसर्गस्नेही उपक्रम

कंधार/प्रतिनिधी-उन्हाळ्याच्या गोड ऋतूमध्ये निसर्गाचा आनंद, आपुलकीच्या भेटीगाठी आणि पारंपरिक संस्कृतीचा गोडवा अनुभवण्यासाठी कंधार येथे रसाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जाधव हॉस्पिटल, कंधारच्या वतीने आयोजित हा विशेष सोहळा रविवार, दि.१७ मे रोजी स.११ ते सायं.६ वाजेपर्यंत नक्षत्र फार्म, घोडज-जांभुळवाडी रोड,कंधार येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. भगवान यशवंतराव जाधव व डॉ. अर्चना भगवान जाधव तसेच समस्त जाधव परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. या निसर्गाचा आनंद घेऊया या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या रसाळीत निमत्रितांना एकत्र येत उन्हाळ्यातील आंब्याच्या रसाचा आस्वाद घेण्याची संधी मिळणार आहे. डॉ. भगवान जाधव आणि डॉ. अर्चना जाधव हे सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतात. जाधव हॉस्पिटलच्या माध्यमातून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न समाजात विशेष उल्लेखनीय मानला जातो. विशेष म्हणजे, मोठ्या प्रमाणात रसाळीची परंपरा कंधार तालुक्याचे माजी आ. शंकरअण्णा धोंडगे यांच्या परिवाराशी संबंधित मानली जाते. त्यामुळे कंधारमध्ये रसाळी सोहळ्याचे आयोजन होत असल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता आणि कौतुकाचे वातावरण निर्माण झाले आहे. निसर्ग, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम ठरणाऱ्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मुख्य सूत्रधाराला अटक करून संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्या

## कंधार पत्रकारांची मागणी

कंधार/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे राज्य संघटक तथा संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधाराला तात्काळ अटक करण्यात यावी तसेच शासनाने त्यांना झेड प्लस सुरक्षा प्रदान करावी, या मागणीचे निवेदन दि.१३ मे रोजी कंधार येथील पत्रकारांच्या वतीने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले.



पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असून त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी शासनाची आहे. संस्थेच्या जमीन वादातून पत्रकार तथा राज्य संघटक संजय भोकरे यांना जीवे मारण्याचा कट रचण्यात आल्याचे पोलिसांच्या सतर्कतेमुळे उघड झाले आहे. आरोपींनी ज्या पद्धतीने कट रचला, त्यावरून भविष्यातही अशा प्रकारचा धोका संभवतो, त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने पाहून तातडीने सुरक्षा द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या संदर्भात संबंधित मंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन पत्रकार संरक्षणासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा कंधारचे अध्यक्ष मिर्झा जमीर बेग, सचिव सुभाष वाघमारे, कार्याध्यक्ष माधव भालेराव, उपाध्यक्ष एस. पी. केंद्रे, सहसचिव भागवत गोरे, कोषाध्यक्ष दिगंबर वाघमारे, संघटक मोहम्मद सिकंदर, हणमंत मुसळे, संतोष कांबळे, माधव गोटमवाड, दत्ता बंधुके आदी उपस्थित होते.

# "एक आमदार,दोन कामदार"जनतेच्या विश्वासाचे केंद्रबिंदू-भाजपा तालुकाध्यक्ष श्रीहरी देशमुख

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघात तळागाळातील विकासकामांना नवी गती देत जनसामान्यांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण करणारे लोकाभिमुख नेतृत्व म्हणून आ.राजेश पवार यांच्याकडे पाहिले जात आहे. "एक आमदार, दोन कामदार" या घोषणेची प्रचिती प्रत्यक्ष कार्यातून देत आ. राजेश पवार व सौ. पूनमताई राजेश पवार या दांपत्याच्या कार्यशैलीमुळे मतदारसंघात जनसामान्यांच्या विश्वासाचे केंद्रबिंदू निर्माण झाले असल्याचे मत भाजपाचे नायगाव तालुकाध्यक्ष श्रीहरी देशमुख यांनी व्यक्त केले. वाढदिवसानिमित्त त्यांनी आ. राजेश पवार यांना शुभेच्छा देत त्यांच्या जनहिताच्या कार्याचे कौतुक केले आहे.

नायगाव विधानसभा मतदारसंघात तळागाळातील विकासकामांना गती देत जनसामान्यांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करणारे कर्तव्यदक्ष आमदार म्हणून आ. राजेश पवार यांची ओळख निर्माण झाली आहे. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत रस्ता, पाणी, वीज, घरे यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आ. पवार यांच्या कार्यशैलीमुळे मतदारसंघात विकासाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. गावपातळीवरील सरपंच व सदस्यांना एकत्रित करून विकासकामांना गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.तसेच सौ. पूनमताई राजेश पवार या देखील सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम तळमळीने राबवत आहेत. महिला सक्षमीकरण, सामाजिक जनजागृती, शैक्षणिक व समाजोपयोगी कार्यक्रमांच्या माध्यमातून त्या सर्वसामान्यांशी सतत संपर्क ठेवत असून त्यांच्या कार्यालाही नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.भारत सरकारच्या रस्ते विकासकामांमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जशी गुणवत्तापूर्ण, टिकाऊ आणि दूरदृष्टी ठेवून विकासाची वेगळी ओळख निर्माण केली, त्याच धर्तीवर नायगाव विधानसभा मतदारसंघात आ. राजेश पवार यांनी विकासकामांचा धडाका लावत जनतेच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.जिल्ह्यातील अनेक आमदारांच्या तुलनेत अधिक विकास निधी मंजूर करून ग्रामपातळीवरील विकास आराखड्याला गती देत रस्ते, पाणी, वीज व मूलभूत सुविधांची कामे मार्गी लावण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे.गावोगावी विकासाची नवी पहाट उभी करत जनतेशी नाळ जोडून तळागाळातील विकासाला नवी दिशा देणाऱ्या आ. राजेश पवार व सौ. पूनमताई पवार यांच्या कार्याचा श्रीहरी देशमुख यांनी वाढदिवसानिमित्त गौरव करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

# पिक विमा प्रश्नासाठी आ.वानखेडे झाले ॲक्टिव्ह; कृषिमंत्र्यांची घेतली मुंबईत भेट

उमरखेड/प्रतिनिधी-या वर्षी यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदतीच्या यादीतून वगळण्यात आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती,या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आ. किसनराव वानखेडे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा सुरू ठेवला आहे.याच गोष्टीला अनुसरून त्यांनी मुंबई येथे राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदत यादीत समाविष्ट करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी केली.

यापूर्वी यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदतीच्या यादीतून वगळण्यात आल्याने आ.किसनराव वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन जिल्ह्याच्या परिस्थितीची सविस्तर माहिती मांडली होती. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि सततची उत्पादनात होणारी घट यामुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणारी पिक विमा योजना ही अत्यंत महत्त्वाची ठरते. मात्र यवतमाळ जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आले होते. शासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे सुद्धा केली होती. त्यानंतर त्यांनी बुधवार दि.१३ मे रोजी मुंबई येथे राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदत यादीत समाविष्ट करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी करून यवतमाळ जिल्ह्याला मदतीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्या वेळी कृषी मंत्री भरणे यांनी पिक विमा संदर्भातील तांत्रिक अडचणी दूर करून यवतमाळ जिल्ह्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, असे अभिवचन दिले. या सकारात्मक चर्चेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी शासनाच्या निर्णयाकडे आशेने पाहत असून पिक विमा मदत जाहीर झाल्यास हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल अशी शेतकरी बांधव अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

# खताचे दर गगनाला:युरिया,डीएपीचा तुटवडा असल्याने शेतकरी संकटात

मांडवी/प्रतिनिधी-हंगाम तोंडावर असतानाच खतांच्या वाढत्या किमती आणि बाजारातील टंचाईमुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. एकीकडे खतांचे भाव गगनाला भिडले असताना, दुसरीकडे शेतीसाठी अत्यंत आवश्यक असलेले डीएपी आणि युरिया खत उपलब्ध नसल्याने मांडवी भागातील शेतकरी आतापासूनच मोठ्या चिंतेत पडले आहेत.

सध्या शेतीचा खर्च अफाट वाढला आहे. मजुरी, बी-बियाणे आणि मशागतीचा खर्च झेपत नसताना आता खतांच्या टंचाईने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, खत खरेदीसाठी पदरचे पैसे मोजण्याची तयारी असूनही बाजारपेठेत खत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खत मिळत नसेल तर शेती करायची कशी? असा उद्विग्न सवाल शेतकरी विचारत आहेत. शासनाच्या ढिसाळ नियोजनामुळेच ही कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. खताअभावी पेरण्या संकटात येण्याची भीती असल्याने, हे सरकार शेतकऱ्यांच्या उरावर बसले आहे का? अशी संतप्त भावना मांडवी परिसरातील शेतकरी व्यक्त करत आहेत. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जर वेळेत खतांचा पुरवठा झाला नाही, तर उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषी विभागाने आणि शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन मांडवी आणि परिसरातील गावांसाठी डीएपी व युरियाचा साठा त्वरित उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

पान १ वरुन

## राज्य मंत्रिमंडळाच्या...

प्रकल्पासाठी आवश्यक जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे. याशिवाय कुसुमाग्रज प्रतिष्ठान संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली.कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी सिंधुरत्न समृद्ध योजना २.० आणखी तीन वर्षे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करून या जिल्ह्यांचा सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला जाणार आहे.पुणे शहरातील मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी राज्य सरकारने तीन शासकीय जमिनी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला.

# हदगावच्या सुपुत्रांची पोलीस दलात झेप;गुफरान पठाण व गोविंद चंदेल यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील दोन तरुण युवकांनी पोलीस भरतीत यश संपादन करून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. गुफरान रहेमान खान पठाण यांची नागपूर ग्रामीण पोलीस दलात, तर गोविंद दिलीपसिंह चंदेल यांची महाराष्ट्र पोलीस, गोंदिया येथे निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.



ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत या दोन्ही युवकांनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या गौरव सोहळ्याप्रसंगी जिल्हाप्रमुख विवेकभाऊ देशमुख आणि नगराध्यक्ष प्रतिनिधी युवानेते भास्करदादा वानखेडे यांनी उपस्थित राहून दोन्ही नवनियुक्त पोलीस जवानांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभाला शिवसेनेचे निवघा विभागप्रमुख सुदर्शन पाटील मनुलेकर, विद्रोही शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गुणवंत काळे सर, नगरसेवक बाळूभाऊ शिंदे, आनंद तावडे, जावेद कुरेशी, अतुल राऊतराव यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.शहरातील तरुणांनी शासकीय सेवेत, विशेषतः पोलीस दलात जाणे ही अभिमानाची गोष्ट आहे. गुफरान आणि गोविंद यांच्या यशामुळे इतर ग्रामीण युवकांनाही मोठी प्रेरणा मिळेल, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. या यशाबद्दल गुफरान पठाण आणि गोविंद चंदेल यांच्या कुटुंबीयांनी तसेच मित्रपरिवाराने आनंद व्यक्त केला असून, हदगाव शहरात त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# देगलूर उपजिल्हा रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन उत्साहात

देगलूर/प्रतिनिधी-येथील उपजिल्हा रुग्णालयात मंगळवारी दि.१२ मे २०२६ रोजी जागतिक परिचारिका दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवनीकर होते.

यावेळी लोकसेवा मंडळाचे सदस्य शिवानंद शिवाचार्य, डॉ. पूजा गायकवाड, मारुती पुलचुवाड तसेच डॉ. अनिल थडके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी आधुनिक परिचर्या सेवेच्या जनक फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व परिचारिकांनी सेवाभावाची शपथ घेऊन कार्यक्रमास सुरुवात केली. या प्रसंगी रुग्णालयातील सर्व परिचारिकांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी सिस्टर मनीषा बोईनवाड यांनी केले. एनसीडी समुपदेशक ॲड. छाया पाटील यांनी कोरोना काळात परिचारिकांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. मारुती पुलचुवाड यांनी परिचारिकांची सेवा, करुणा आणि रुग्णांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. शिवानंद शिवाचार्य यांनी रुग्णसेवेलाच ईश्वरसेवा मानत परिचारिकांच्या समर्पित सेवाभावाचा गौरव केला. कार्यक्रमाला ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गायकवाड, डॉ. भगवान पितळे, डॉ. रवि काळे, डॉ. मोहम्मद उस्मान, डॉ. शेख मुजीब, डॉ. व्ही. के. काझी, डॉ. संजय लाडके यांच्यासह लोकसेवा मंडळाचे पदाधिकारी, परिचारिका, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिक विमा व खत-बियाणे प्रश्नांवर देगलूरात उद्या शेतकऱ्यांचे आंदोलन

देगलूर/प्रतिनिधी-जुलै-ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हक्काचा पिक विमा मिळावा यासाठी विविध स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर एप्रिल महिन्यात देगलूर तालुक्यासाठी भरीव पिक विमा मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली होती. काही महसूल मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झाली असली, तरी मरखेल, देगलूर आणि खानापूर महसूल मंडळातील अनेक शेतकरी अद्यापही विमा लाभापासून वंचित आहेत.

या तीन महसूल मंडळांतील एकाही शेतकऱ्याच्या खात्यात अद्याप पिक विम्याची रक्कम जमा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर बाजारात खत व बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करून वाढीव दराने विक्री होत असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. त्यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे शेतकरी नेते तथा काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांच्या पुढाकाराने शुक्रवार, दि.१५ मे रोजी सकाळी १० वाजता देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.वंचित शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा वितरित करावा, खत व बियाण्यांची कृत्रिम टंचाई रोखावी आणि शेतकऱ्यांना योग्य दरात कृषी साहित्य उपलब्ध करून द्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी, युवक व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिलासा की,दुर्दशा?: मांडवी-लिंगी तांडा रस्त्याच्या कामाचा खोळंबा




मांडवी/प्रतिनिधी-पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत मांडवी ते लिंगी आणि लिंगी तांडा या मार्गाच्या रस्ता दुरुस्तीचे काम सध्या सुरू आहे. मात्र, पावसाळा उंबरठ्यावर असतानाही हे काम अत्यंत कासवगतीने सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. शासनाने या मार्गासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर केला असला, तरी कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे पावसाळ्यात नागरिकांना चिखलातून पायपीट करावी लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

मांडवी ते लिंगी तांडा या मार्गावर डांबरीकरण आणि सिमेंट रस्ते व्हावेत, जेणेकरून या भागातील दळण-वळणाचा प्रश्न कायमचा सुटावा, या उद्देशाने शासनाने मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. रस्ता चांगला होईल या आशेवर नागरिक होते, मात्र सद्यस्थिती पाहता, दोन कँत्राटदार काम करीत आहे.आपल्या मर्जीप्रमाणे अत्यंत संथ गतीने काम करत असल्याचे चित्र आहे.जिथे डांबरीकरन झाले. त्याठिकणी बाजूला मुरूमचा भरावं भरला गेला नाही त्यामुळे रस्ता खच्चान्याची भीत आहे. त्याचबरोबर डांबरचा वापर कमी केला असा आरोप नागरिक करीत आहे. या कामावर नियंत्रण ठेवणारे यंत्रणेचे अधिकारी 'उंटावरून शेळ्या हाकण्याचे' प्रकार करत आहे. एकीकडे कँत्राटदाराचा ढिसाळपणा सुरू असताना, दुसरीकडे या कामावर नियंत्रण ठेवणारे अधिकारी मात्र लक्ष देत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. जर पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे खडीकरण आणि आवश्यक स्तर पूर्ण झाले नाहीत, तर हा संपूर्ण मार्ग चिखलमय होईल.विद्यार्थ्यांना शाळेत जाणे कठीण होईल.रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी रुग्णवाहिका येणे अशक्य होईल.दैनंदिन व्यवहारासाठी ग्रामस्थांना मैलोन्मैल पायपीट करावी लागेल. आता या गंभीर समस्येकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देऊन पावसाळ्यापूर्वी हा मार्ग सुखकर करणार का? की, ग्रामस्थांच्या नशिबी पुन्हा पायपीटच येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

> "शासनाने निधी दिला असूनही जर आम्हाला पावसाळ्यात त्रास सहन करावा लागला, तर या कामाचा काय उपयोग? संबंधित विभागाने तातडीने कंत्राटदाराला सूचना देऊन कामाला गती द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."
> **-ग्रामस्थ,** लिंगी तांडा परिसर



लोहा येथील शिवकल्याणनगरमध्ये रस्त्याच्या मधोमध खड्डा पडला असून या खड्डयात वाहने फसत आहेत, यामुळे वाहनांचे नुकसान होत आहे. अशाच एका कारचे पुढील चाक खड्डयात फसल्याने वाहन धारकाला खड्डयातून सुटका करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. नेहमीच्या होणाऱ्या या प्रकाराकडे लोहा न.प.प्रशासनाने तात्काळ लक्ष देवून वाहनधारकांची होणारी अडचण दुर करण्याची मागणी होत आहे.

# नवनिर्वाचित १० आमदारांचा शपथविधी सोहळा संपन्न

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषदेच्या नवनिर्वाचित १० आमदारांचा शपथविधी सोहळा गुरुवारी (१४ मे) विधान भवनात पार पडला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते सर्व आमदारांना शपथ देण्यात आली. मात्र, या शपथविधीदरम्यान आमदार बच्चू कडू यांनी मुख्य सचिवांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने कार्यक्रमात काही काळ चर्चेचे वातावरण निर्माण झाले.

शपथविधीची सुरुवात शिवसेना (शिंदे गट) नेत्या नीलम गोऱ्हे यांच्या शपथविधीने झाली. त्यानंतर बच्चू कडू, शिवसेना ठाकरे गटाचे अंबादास दानवे, भाजपच्या प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवी नाईक, विवेक कोल्हे, संजय भेंडे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिद्दीकी यांनी आमदारकीची शपथ घेतली. विधान परिषदेच्या १० जागांसाठी यंदा बिनविरोध निवडणूक झाली होती. त्यामध्ये भाजपचे पाच, शिवसेना शिंदे गटाचे दोन, तर शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे प्रत्येकी एक सदस्य निवडून आले आहेत.

# आ.राजेश पवार यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रम

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश संभाजी पवार यांच्या वाढदिवसा निमित्त भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजहित जपण्याच्या उद्देशाने आरोग्य, रक्तदान, रुग्णसेवा, पर्यावरण संवर्धन तसेच जनसेवेचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



या पार्श्वभूमीवर नायगाव तालुक्यातही विविध सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दि.१५ मे रोजी मुगाव येथे भाजप युवा कार्यकर्ते अवकाश पाटील धुपेकर यांच्या पुढाकारातून भव्य आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच पक्षी बचाव अभियान राबविण्यात येणार आहे. पशु-पक्ष्यांसाठी पाणी व खाद्याची व्यवस्था करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळावा, रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी तसेच पर्यावरण आणि जीवसृष्टीप्रती संवेदनशीलता निर्माण व्हावी, या उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.आ.राजेश संभाजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवा उपक्रम राबविले जात असल्याने कार्यकर्ते व नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# केरळच्या मुख्यमंत्रीपदी व्ही.डी.सतीशन

तिरुअनंतपुरम:केरळच्या मुख्यमंत्रिपदी काँग्रेस नेतृत्वाने अखेर वरिष्ठ नेते व्ही. डी. सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला आहे. त्यामुळे केरळचे पुढील मुख्यमंत्री म्हणून सतीशन यांचे नाव निश्चित झाले आहे. केरळमध्ये सत्ता स्थापनेसाठी सज्ज झालेल्या संयुक्त लोकशाही आघाडीत मुख्यमंत्रीपदासाठी गेल्या काही दिवसांपासून जोरदार रस्सीखेच सुरू होती. सखोल विचारमंथनानंतर अखेर सतीशन यांच्या नावावर एकमत झाले आहे.



मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि ज्येष्ठ नेते रमेश चेन्निथला यांचीही नावे चर्चेत होती.२०२६ च्या केरळ विधानसभा निवडणुकीत संयुक्त लोकशाही आघाडीने १४० पैकी तब्बल १०२ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत संपादन केले. या विजयामागे विरोधी पक्षनेते म्हणून व्ही. डी. सतीशन यांनी राबवलेल्या आक्रमक मोहिमेचा मोठा वाटा मानला जात आहे. सत्ताधारी डाव्या आघाडीविरोधात त्यांनी सातत्याने प्रभावी भूमिका मांडली होती.व्ही.डी.सतीशन यांनी परावूर मतदारसंघातून सलग सहाव्यांदा विजय मिळवला. त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार ई.टी.टायसन मास्टर यांचा तब्बल २० हजार ६०० मतांनी पराभव केला. सतीशन यांना ७८ हजार ६५८ मते मिळाली. २००१ मध्ये प्रथमच विधानसभा गाठल्यानंतर त्यांनी तब्बल २५ वर्षे परावूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे.२०२१ पासून केरळ विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून कार्यरत असलेले सतीशन हे काँग्रेसच्या नव्या पिढीतील प्रभावी आणि आक्रमक नेतृत्व मानले जाते. विविध राजकीय, प्रशासकीय आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर त्यांनी डाव्या सरकारला सातत्याने धारेवर धरले होते. केरळ प्रदेश काँग्रेस समितीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

पान १ वरुन

## नीट पेपरफुटी प्रकरणी...

माहिती सीबीआयच्या तपासातून समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणात मोठ्या आर्थिक व्यवहारांचे जाळे कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.दरम्यान, लातूरमधील खासगी क्लासेसच्या माध्यमातूनही पेपरफुटीचे धागेदोरे समोर येत असल्याने पोलिसांनी तपास अधिक तीव्र केला आहे. आतापर्यंत सहा जणांचे जबाब नोंदवण्यात आले असून, संशयित खासगी क्लासेसची सखोल चौकशी सुरू आहे.

## मोठ्या शासकीय कार्यक्रमांवर...

केली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावर विरोधकांनी केलेल्या टीकेलाही फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. जगातील अनेक देश सध्या याहून कठोर निर्णय घेत आहेत. पंतप्रधानांनी केवळ थोडासा त्याग करण्याचे आवाहन केले आहे. त्यावरून अनावश्यक गदारोळ करणे योग्य नाही, असे ते म्हणाले.यावेळी त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्या काळातही अशा प्रकारचे निर्णय घेण्यात आल्याची आठवण करून दिली. देशहितासाठी थोडे जुळवून घेण्याची तयारी नसेल, तर विरोधकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असा टोला त्यांनी लगावला.




हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४